## निशाणी ५ खालील आदेश

१. अर्जदार क्र. १ यांनी सदरील अर्ज हा अंतरिम आदेश म्हणून त्यांना व अर्जदार क्र. २ यांना दरमहा प्रत्येकी रुपये २०,०००/ पोटगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. अर्जदार क्र. १ यांच्या कथनानुसार, अर्जदार क्र. १ यांचा विवाह गैरअर्जदार क्र. १ यांचे सोबत दिनांक ३०/४/२००८ रोजी मुस्लिम धर्मशास्त्राप्रमाणे झालेला असून त्यांचे पती—पत्नीचे नाते आजतागायात कायम आहे व त्यांना अर्जदार क्र. २ अर्ष इरफान शेख नावाचा मुलगा आहे. अर्जदार क्र. १ यांचे, गैरअर्जदार क्र. १ हे पती आहेत, गैरअर्जदार क्र. २ हे त्यांचे सासरे आहेत, गैरअर्जदार क्र. ३ ही त्यांची सासू आहे व गैरअर्जदार क्र. ४ हे मौलाना आहेत. लग्नानंतर अर्जदार क्र.१ या, गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांचे सोबत सासरी नांदण्यास गेलेल्या होत्या. परंतु, लग्नानंतर गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी अर्जदार क्र. १ यांना केवळ पंधरा दिवस व्यवस्थित नांदवले. त्यानंतर, गैरअर्जदार क्र. १ हे घरी दारू पिऊन येत होते व अर्जदार क्र. १ यांना शिवीगाळी करत होते. याबाबत, अर्जदार क्र. १ यांनी, गैरअर्जदार क्र. २ व ३ यांना सांगितले असता, त्यांनी देखील अर्जदार क्र. १ यांना असे सांगितले की, आमचे मुलाला दारू पिण्याचे व्यसन आहे व तुला हे आयुष्यभर सहन करावे लागेल. अर्जदार क्र. १ यांनी, गैरअर्जदार क्र. १ यांना दारू पिऊ नका असे सांगितले असता, गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ यांना बेदम मारहाण केली होती. तसेच गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी अर्जदार क्र. १ यांना, तुझ्या वडिलांनी लग्न व्यवस्थित लावून दिले नाही, हुंडा दिला नाही, म्हणून मानसिक व शारीरिक त्रास दिला होता. तसेच अर्जदार क्र. १ या गरोदर असताना गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी अर्जदार क्र. १ यांना औषधोपचार केला नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ यांचा गर्भपात झालेला होता. त्यानंतर देखील गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी, अर्जदार क्र. १ यांना मानसिक व शारीरिक त्रास दिलेला आहे. परंतु अर्जदार क्र. १ यांनी भविष्याचा विचार केला व सदर त्रास सहन केला होता.

३. त्यानंतर, अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांना दिनांक ०८/०३/२०१२ रोजी, अर्जदार क्र. २ म्हणजेच अर्ष नावाचा मुलगा झालेला आहे. परंतु, त्यानंतर देखील गैरअर्जदार क्र. १ हे रात्री अपरात्री घरात दारू पिऊन उशिरा येत होते व तू मुलासहित तुझ्या वडिलांकडे निघून जा, मला खुलानामा दे व मला सोडून दे, मला दुसरा विवाह करायचा आहे असे अर्जदार क्र. १ यांना म्हणत होते व जबरदस्त मारहाण

करत होते. त्यानंतर, गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी अर्जदार क्र. १ व २ यांना, दिनांक १६/०८/२०१९ रोजी घरातून हाकलून दिले होते. तेव्हापासून अर्जदार क्र. १ व २ हे अर्जदार क्र. १ यांचे माहेरी राहत आहेत. त्यानंतर अर्जदार क्र. १ व २ हे अर्जदार क्र. १ यांच्या माहेरी राहत असताना, दिनांक २०/१०/२०१९ रोजी, गैरअर्जदार क्र. १ ते ४, हे अर्जदार क्र. १ यांच्या माहेरी गेले व अर्जदार क्र. १ यांना म्हणाले की, आम्हांला खुलानामा द्या, आमच्या मुलाचे दुसरे लग्न करावयाचे आहे व आमचा मुलगा अर्जदार क्र. २ यांना आम्हाला देऊन टाका व गैरअर्जदार क्र. १ हे, अर्जदार क्र. २ अर्ष शेख यास जबरदस्तीने अर्जदार क्र. १ यांच्या ताब्यातून ओढून घेऊन जाऊ लागले होते. त्यावेळेस देखील गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांनी, अर्जदार क्र. १ यांना जबरदस्त मारहाण केली. तसेच गैरअर्जदार क्र. ४ हे, अर्जदार क्र. १ यांना म्हणाले की, तुझा नवरा हा दुसरा विवाह करणार आहे, त्याला खुलानामा देऊन टाक, आपल्या धर्मामध्ये तुझ्या परवानगीची काही गरज नाही. त्यामुळे सदर घडलेल्या घटनेबाबत अर्जदार क्र. १ यांनी, दिनांक २०/१०/२०१९ रोजी स्वारगेट पोलीस स्टेशन येथे गैरअर्जदार यांचे विरुद्ध तक्रार दाखल केलेली आहे.

४. तसेच, अर्जदार क्र. १ यांना, त्यांचे नातेवाईकांकडून अशी माहिती मिळाली आहे की, गैरअर्जदार क्र. १ यांनी दुसरा विवाह केलेला आहे. अशाप्रकारे, गैरअर्जदार क्र. १ यांच्यामध्ये कोणताही बदल झाला नाही. याउलट गैरअर्जदार क्र. १ ते ४ अर्जदार क्र. १ यांना मारहाण करून त्यांचा मानसिक व शारीरिक छळ केलेला आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ व २ यांना, अर्जदार क्र. १ यांच्या माहेरी जाऊन राहणे भाग पडले आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ व २ यांना पालनपोषणासाठी व अर्जदार क्र. २ यांच्या शिक्षणासाठी पोटगी म्हणून आर्थिक मदतीची गरज आहे, त्याकरिता त्यांनी वरील प्रमाणे मागणी केलेली आहे

५. गैरअर्जदार यांनी, त्यांचे म्हणणे दाखल केले असून, त्यांचा विवाह व त्यांना अर्जदार क्र. २ अर्ष शेख नावाचा मुलगा असल्याचे मान्य केलेले आहे व अर्जदार यांनी अर्जामध्ये नमूद केलेला सर्व मजकूर नाकारलेला आहे. गैरअर्जदार यांच्या म्हणण्यानुसार अर्जदार क्र. १ ही कधीही चांगली नांदलेली नाही. गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांनी कधीही अर्जदार क्र. १ व २ यांचा घरगुती हिंसाचार केलेला नसून, अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदार क्र. १ यांचा स्वत:हून त्याग केलेला आहे व अर्जदार क्र. १ तिच्या राजे खुशीने व मर्जीने ती तिच्या माहेरी राहत आहे. गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांनी अर्जदार क्र. १ यांना कधीही शिवीगाळी, मारहाण केलेली नाही. तसेच अर्जदार क्र. १ यांचा कधीही मानसिक व

शारीरिक छळ केलेला नाही. गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. १ यांना कधीही हुंडा मागितलेला नाही. याउलट अर्जदार क्र. १ यांचे, सदर लग्नापूर्वी, दुस—या मुलावर प्रेम होते. अर्जदार क्र. १ यांनी गैरअर्जदार क्र. १ यांना असे सांगितले होते की, सदर विवाह त्यांच्या इच्छेविरुद्ध, त्यांच्या आई—वडिलांनी व मामांनी केलेला आहे. अर्जदार क्र. १ हे घरातील काम करत नसून, गैरअर्जदार क्र. २ व ३ हे घरातील कामे करत असतात. अर्जदार क्र. १ या गैरअर्जदार क्र. २ व ३ यांना घालून पाडून बोलत होते. तसेच, त्यांना रोज त्रास देत होते. अर्जदार क्र. १ या मोबाईल वरून रात्री उशिरापर्यंत दुस—या मुलासोबत बोलत असतात. अर्जदार क्र. १ या पहिल्यांदा गरोदर राहिल्यानंतर, केवळ अर्जदार क्र. १ यांच्या निष्काळजीपणामुळे व त्यांना बाळ नको असल्यामुळे, त्यांनी इतर गोळ्या खाल्ल्यामुळे, सदर गर्भपात झालेला आहे. अर्जदार क्र. १ यांनी, गैरअर्जदार यांचे विरुद्ध खोटे आरोप केलेले आहेत. गैरअर्जदार हे, अर्जदार क्र. १ व २ यांना नांदवण्यास आजही तयार आहेत. परंतु अर्जदार क्र. १ यांना, गैरअर्जदार यांचे सोबत नांदायचे नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ यांना, गैरअर्जदार यांचे सोबत राहायचे नसल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह त्यांनी स्वतः करावा असे म्हणणे गैरअर्जदार यांनी अभिलेखावर दाखल केलेले आहे.

६. अर्जदार यांचा अर्ज व गैरअर्जदार यांचे म्हणणे वाचले. त्यावरुन खालील मुद्‌दे माझ्या विचारार्थ निघत असून, मी, त्याचे निष्कर्ष खालील दिलेल्या कारणांसहित नोंदवत आहे.

| अ.क्र. | मुद्‌दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र.१ ते २ यांचा घरगुती हिंसाचार केला आहे हे अर्जदार प्रथमदर्शनी शाबीत करतात का? | होय |
| २. | अर्जदार क्र.१ व २ यांना प्रत्येकी दरमहा २०,०००/— रुपये अंतरीम पोटगी म्हणून मिळण्यास पात्र आहेत काय? | अंशतः होकारार्थी |
| ३. | अंतिम हुकुम काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

७. अर्जदार यांचे वकीलांनी युक्तिवाद केला आहे की, अर्जदार क्र. १ यांना गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांनी मारहाण करून शिवीगाळ केली. तसेच अर्जदार क्र. १ व २ यांचा शारीरिक, मानसिक व भावनिक छळ केलेला आहे. अर्जदार क्र. १ व २ हे अर्जदार क्र. १ यांच्या माहेरी राहत असून त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यामुळे, अर्जदार क्र. १ व २ यांना आर्थिक मदत म्हणून पोटगीची नितांत गरज असल्याने, सदर पोटगीचा अर्ज मंजूर करावा असा युक्तिवाद केलेला आहे.

८. गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांचे तर्फे वकिलांनी असा युक्तिवाद केलेला आहे की, गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांनी, अर्जदार यांना कधीही मारहाण, शिवीगाळी केलेली नाही. अर्जदार क्र. १ व २ यांचा कधीही शारीरिक, मानसिक व भावनिक छळ केलेला नाही. अर्जदार क्र. १ या स्वत:हून त्यांच्या माहेरी राहत असल्यामुळे, अर्जदार क्र. २ हे देखील अर्जदार क्र. १ यांचे सोबत त्यांच्या माहेरी राहत आहेत. अर्जदार क्र. १ या कधीही गैरअर्जदार यांचे सोबत चांगल्या राहिलेल्या व वागलेल्या नाहीत. तरीसुद्धा, गैरअर्जदार क्र. १ हे, अर्जदार क्र. १ व २ यांना नांदवण्यास तयार आहेत. परंतु, अर्जदार क्र. १ या स्वत: हून गैरअर्जदार क्र. १ यांचे सोबत राहण्यास येत नाहीत. त्यामुळे, गैरअर्जदार क्र. १ हे अर्जदार क्र. १ व २ यांना पोटगी देणे लागत नाहीत. याशिवाय अर्जदार क्र. २ यांचा ताबा गैरअर्जदार यांना दिल्यास गैरअर्जदार हे, अर्जदार क्र. २ यांचा सांभाळ करू शकतात. त्यामुळे अर्जदार क्र. १ यांचा सदर अर्ज फेटाळण्यात यावा, असा गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांचे वकिलांनी युक्तीवाद केलेला आहे

**मुद्दा क्र. १ करिता**

९. घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ च्या कलम ३ मध्ये घरगुती हिंसाचाराची विस्तृत व्याख्या दिलेली आहे. त्यामध्ये शारीरिक, मानसिक, भावनिक, तसेच आर्थिक छळ इत्यादी बाबींचा समावेश होतो. अर्जदार क्र. १ यांनी त्यांच्या अर्जात म्हटले आहे की, गैरअर्जदार हे त्यांना वारंवार मारहाण व शिवीगाळी करत होते. अर्जदार यांचा मानसिक, भावनिक व शारीरिक छळ करत होते. त्यामुळे, सदर घडलेल्या घ टनेबाबत, अर्जदार क्र. १ यांनी दिनांक २०/१०/२०१९ रोजी स्वारगेट पोलीस स्टेशन येथे गैरअर्जदार यांचे विरुद्ध तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारी अर्जाची प्रत अभिलेखावर अर्जदार क्र. १ यांनी दाखल केलेली आहे. तसेच अर्जदार क्र. १ यांना त्यांचे नातेवाईकांकडून अशी माहिती मिळाली आहे की, गैरअर्जदार क्र. १ यांनी दुसरा विवाह केलेला आहे. परंतु, त्याबाबतची शाबीती स्पष्ट करणारा कोणताही प्राथमिक दर्शनी पुरावा अगर कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेले नाहीत. याउलट, गैरअर्जदार यांच्या म्हणण्यानुसार, अर्जदार क्र. १ यांचे, सदर विवाहापूर्वी दुस—या मुलासोबत प्रेम संबंध होते व त्यांचे सोबत अर्जदार क्र. १ हे फोनवर बोलत होते. परंतु त्याबाबतची शाबीती स्पष्ट करणारा कोणताही प्राथमिक दर्शनी पुरावा अगर कागदपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाहीत. तसेच अर्जदार क्र. १ या, गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांना त्रास देत होते व घालून पाडून बोलत होते हे दर्शवणारा देखील प्राथमिक दर्शनी पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही, असे प्रथम दर्शनी दिसून येत आहे.

१०. त्यामुळे, अर्जदार क्र. १ यांनी, दिनांक २०/१०/२०१९ रोजी स्वारगेट पोलीस स्टेशन येथे गैरअर्जदार यांचे विरुद्ध दाखल केलेला तक्रारी अर्ज यावरून प्राथमिक दर्शनी असे स्पष्ट होते की, गैरअर्जदार हे, अर्जदार क्र. १ यांना गैरवागणूक देत होते व मारहाण करत असल्याचे स्पष्ट होते. तसेच, अर्जदार क्र. १ व २ हे, गैरअर्जदार क्र. १ यांचे सोबत राहत नसल्याचे स्पष्ट होते. अर्जदार क्र. १ यांना १ अपत्य असून कोणतीही विवाहित स्त्री ज्यावेळेस तिला अपत्य असताना, तिच्या पतीला, रास्त कारण असल्याशिवाय सोडून राहू शकत नाही. तसेच अर्जदार क्र. १ व २ आजरोजी अर्जदार क्र. १ यांच्या माहेरी राहत असून, गैरअर्जदार क्र. १ हे त्यांच्या पालनपोषणासाठी कोणतीही आर्थिक मदत करत नसल्याचे दिसून येते. तसेच गैरअर्जदार यांच्या म्हणण्यानुसार, गैरअर्जदार हे अर्जदार क्र. १ यांना परत नांदवण्यास तयार आहेत. म्हणून, सदर न्यायालयाने वेळोवेळी अर्जदार व गैरअर्जदार यांचे मध्यस्थी केंद्रामार्फत समझोता करण्याचा प्रयत्न केलेला होता. तसेच सदर न्यायालयाने देखील वेळोवेळी अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांच्यामध्ये मध्यस्थी करून त्यांच्यातील वाद मिटवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला होता. परंतु, अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये कोणताही समझोता झालेला नाही. त्यामुळे सदरील विवेचनावरून प्रथम दर्शनी असे दिसून येते की, गैरअर्जदार यांनी, अर्जदार क्र. १ व २ यांचा घरगुती हिंसाचार केलेला आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करिता</u>**

११. गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. १ व २ यांचा घरगुती हिंसाचार केलेला आहे हे सकृत दर्शनी निष्कर्ष नोंदवल्यानंतर, अर्जदार क्र. १ यांनी, स्वत: करिता व अर्जदार क्र. २ यांच्याकरिता दरमहा प्रत्येकी रुपये २०,०००/— पोटगी मिळण्याकरिता सदर अर्ज दाखल केलेला आहे. परंतु अर्जदार क्र. १ यांच्या मागणीप्रमाणे, गैरअर्जदार हे त्यांना पोटगी देऊ शकतात का हे पाहणे जरुरीचे आहे. गैरअर्जदार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये, तसेच दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये असे नमूद केलेले आहे की, गैरअर्जदार क्र. १ हे, वाहन चालक म्हणून काम करतात. तसेच त्यांना दरमहा रुपये ५,०००/— पगार असल्याबाबत त्यांनी प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे सांगितले आहे की, त्यांचे आई व वडील हे त्यांच्यावर अवलंबून आहेत. त्याचप्रमाणे अर्जदार क्र. २ अर्ष शेख यांचा सांभाळ करण्यास ते तयार आहेत. परंतु अर्जदार क्र. १ यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे सांगितले आहे की, गैरअर्जदार क्र. १ हे रिक्षाचे गॅरेज चालवतात व त्यांना दरमहा ६० ते ७० हजार उत्पन्न मिळते. परंतु, त्याबाबतची शाबीती स्पष्ट करणारा कोणताही प्राथमिक दर्शनी पुरावा अगर

कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेले नाहीत.

१२. अशाप्रकारे, अर्जदार क्र. १ व २ यांची पोटगी बाबतची मागणी व गैरअर्जदार क्र. १ यांचे दरमहा उत्पन्न या बाबी लक्षात घेता, प्राथमिक दर्शनी असे स्पष्ट होते की, अर्जदार क्र. १ या कोणतेही काम करत नाहीत. तसेच अभिलेखावरील कागदपत्रांवरून असे स्पष्ट होते की, अर्जदार क्र. १ यांचे शिक्षण पदवी पर्यंत झालेले आहे. परंतु अर्जदार क्र. १ या नोकरी करत असल्याबाबत अगर त्यांना उत्पन्नाचे अन्य साधन असल्याबाबतचे प्रथम दर्शनी कोणतेही कागदपत्र व दर्शनीय पुरावा अभिलेखावर दाखल नाही असे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे, गैरअर्जदार क्र. १ यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रामध्ये व म्हणण्यामध्ये सांगितल्याप्रमाणे त्यांचे शिक्षण इयत्ता सातवी पर्यंत झालेले आहे व त्यांना दरमहा रुपये ५,०००/— इतका पगार आहे. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ यांचेवर, त्यांचे आई—वडील म्हणजेच गैरअर्जदार क्र. २ व ३ यांची जबाबदारी आहे असे दिसून येते. त्यामुळे कायद्यातील तरतुदी अन्वेय, गैरअर्जदार क्र. १ यांचेवर त्यांची स्वत:ची व त्यांच्या आई—वडिलांची त्याचप्रमाणे त्यांची पत्नी व मुलगा म्हणजेच अर्जदार क्र. १ व २ यांची कायदेशीररित्या जबाबदारी आहे. गैरअर्जदार क्र. १ हे, त्यांच्या आई—वडिलांची जबाबदारी घेत असून, त्यांचा उदरनिर्वाह करत आहेत. परंतु अर्जदार क्र. १ यांना, त्यांच्या स्वत:च्या व त्यांचा मुलगा अर्जदार क्र. २ यांच्या उदरनिर्वाहकरिता, तसेच शैक्षणिक खर्चा करिता, अर्जदार क्र. १ त्यांच्या माहेरच्या लोकांवर अवलंबून राहावे लागत आहे असे प्राथमिक दर्शनी दिसून येत. तसेच, गैरअर्जदार क्र. १ हे त्यांची पत्नी व मुलगा म्हणजेच अर्जदार क्र. १ व २ यांच्या उदरनिर्वाहकरिता कोणतीही तजवीज करत नसल्याचे देखील दिसून येते. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ यांनी, त्यांची पत्नी व मुलगा या नात्याने अर्जदार क्र. १ व २ यांचा सांभाळ करणे व त्यांच्या पालनपोषणाची व्यवस्था करणे ही सर्वस्वी नैतिक व कायदेशीर जबाबदारी गैरअर्जदार क्र. १ यांचीच असून ती त्यांनी पार पाडलेली दिसत नाही असे प्रथम दर्शनी स्पष्ट होते.

१२. घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ कलम २३ सह कलम २० अन्वये सदर न्यायालय अर्जदार क्र. १ व २ यांना आर्थिक मदत म्हणून अंतरिम आदेश पारित करू शकते. अर्जदार क्र. १ व २ हे सद्यपरिस्थितीत अर्जदार क्र. १ यांच्या माहेरी राहत आहेत व त्यांना उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही असे प्रथम दर्शनी स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे वरील सर्व विवेचनावरून सद्यपरिस्थितीमध्ये गैरअर्जदार क्र. १ यांनी, जबाबदार पती व वडील या नात्याने अर्जदार क्र. १ व २ यांची सर्वस्वी काळजी व जबाबदारी घेणे अपेक्षित होते. परंतु, अर्जातील नमूद कथनावरून, गैरअर्जदार

क्र. १ यांनी तसे केलेले नाही असे प्रथम दर्शनी स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे, अर्जदार क्र. १ व २ यांच्या पालनपोषणासाठी लागणारा खर्च, वैद्यकीय उपचारासाठी लागणारा खर्च, अर्जदार क्र. २ याच्या शिक्षणासाठी लागणारा खर्च व इतर खर्चाचा विचार करिता, तसेच, गैरअर्जदार क्र. १ यांना दरमहा मिळणारे उत्पन्न व त्यांचेवरील त्यांच्या आई—वडीलांची असलेली जबाबदारी या सर्वांचा विचार करता, गैरअर्जदार क्र. १ यांनी, अर्जदार क्र. १ व २ यांना प्रत्येकी दरमहा रुपये १,०००/— असे एकत्रित दरमहा रुपये २,०००/— आर्थिक मदत म्हणून पोटगी द्यावी असा आदेश पारित करणे, न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल. त्याकरिता, मी, मुद्दा क्र. २ चे निष्कर्ष त्याप्रमाणे नोंदवत आहे

**<u>मुद्दा क्र. ३ करिता</u>**

१३. मुद्दा क्र. १ व २ यांचा एकत्रित विचार केला असता, मी, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ यांनी, अर्ज दाखल तारखेपासून ते अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत घरगुती हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ सह कलम २० अन्वये आर्थिक मदत म्हणून अर्जदार क्र. १ व २ यांना दरमहा प्रत्येकी रक्कम रु. १,०००/— असे एकत्रित दरमहा रुपये २,०००/— दयावी असा आदेश देण्यात येतो.

३. अर्ज दाखल तारखेपासून ते अंतरीम अर्जावरील आदेश होणेपर्यंतची आर्थिक मदतीची एकत्रित रक्कम ही गैरअर्जदार यांनी आदेश पारित झाल्यापासून ३ महिन्याच्या आतमध्ये अर्जदार क्र. १ व २ यांना दयावी व तेथून पुढील रक्कम ही प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आतमध्ये अर्जदार क्र.१ व २ यांना दयावी असा देखील आदेश देण्यात येतो.

४. अर्जदार व गैरअर्जदार यांना सदरील आदेशाची प्रत घरगुती हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २४ अन्वये विनाशुल्क देण्यात यावी.

५. अर्जदाराच्या इतर मागण्या तुर्तास फेटाळण्यात येतात.

Sd/-

खडकी, पुणे.
दिनांक: २३.०९.२०२२

( सौ. वृषाली पाटील )
सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
खडकी—पुणे

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file of order are same word for the word as per original order.

Name of Steno :- Shri. P.D.Mane, Steno L.G.

Court Name :- Smt. Vrushali K. Patil.
Jt. Judicial Magistrate F.C.,
Khadki Pune.

Date of decision. :- 23/09/2022.

P. O. signed on :- 23/09/2022.